गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २५ वा | रविवार ११ जून २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 25 | Date : 11/06/2023 | blow : Sanday | Page 4 | Price 4

## अमित शाह यांच्याकडून मुस्लीम आरक्षण, नामांतर, युतीवरून उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल



नांदेड : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नांदेडमधील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करतानाच उद्धव ठाकरे यांच्यावर कडाडून हल्लाबोल केला. अमित शाह यांनी मोदी सरकारच्या गेल्या ९ वर्षातील कामगिरीचा लेखाजोखा मांडतानाच विशेष करून उद्धव ठाकरे आणि काँग्रेसला जोरदार लक्ष्य केले. शाह यांनी आपल्याला पंतप्रधान म्हणून मोदी हवेत की राहुल? अशी विचारणा जाहीर सभेत केली. अमित शाह म्हणाले की, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे दिग्गज नेते आहेत. महाराष्ट्राला एक नंबरमध्ये आणण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी मोठे कार्य केले आहे.

नांदेडच्या सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सुरू असलेल्या उपक्रमाचा एक भाग म्हणून संबोधित केले. शाह म्हणाले की, सोनियाजींच्या सरकारच्या नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नऊ वर्षात इतिहास घडवला. या कालावधीत एकही भ्रष्टाचाराचा आरोप लागला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला सुरक्षित ठेवण्याचा काम देखील केल. पाकिस्तानला घरामध्ये घुसून हल्ला करायचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल

अमित शाह यांनी सांगितले की, ज्यावेळी उद्धव ठाकरे यांच्याशी युतीची बोलणी करण्यासाठी गेलो होतो, त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री राहणार असे उद्धव ठाकरे यांनी देखील सांगितले होते. त्यामुळे अस झालं का नाही? याचे उत्तर द्या ३७० हटवलं हे योग्य केलं की नाही? राम मंदिर उभारणी योग्य आहे की नाही? या सगळ्यांची उत्तर उद्धव ठाकरे यांनी द्यावी. ते पुढे म्हणाले की, मुस्लिम आरक्षण संविधानिक नाही. मुस्लिम आरक्षण पाहिजे की नाही हे देखील उद्धव ठाकरे यांनी सांगावं. द्यायला पाहिजे की नाही हे सांगावं. जेवढे प्रश्न उभे केले आहेत या सगळ्यांचे उत्तर उद्धव ठाकरे यांनी जनते समोर द्यावे.

समर्थन करू शकतात का?

२०१९ मध्ये, उद्धव ठाकरे यांनी एका बैठकीत ≈अ ला सत्तेत आल्यास देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असे मान्य केले होते, पण सत्तेसाठी आणि मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरे गेले आणि काँग्रेस-राष्ट्रवादीची बाजू घेतली, अशी टीका त्यांनी केली. शहा यांनी उद्धव ठाकरेंवर आणखी हल्ला चढवत म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी समान नागरी संहितेबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करावी, अशी आमची इच्छा आहे. काँग्रेसच्या वीर सावरकर विरोधी भूमिकेवर कोणती भूमिका आहे, काँग्रेसची बाजू घेतल्यानंतर औरंगाबाद, उस्मानाबाद आणि अहमदनगरच्या नामांतराचे समर्थन करू शकतात का? अशी विचारणा त्यांनी केली.

पंतप्रधान कोण हवेत?

२०१४ आणि २०१९ मध्ये नरेंद्र मोदींना मोठ्या प्रमाणावर जनादेश दिल्याबद्दल । पान २ वर

## प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे नवे कार्यकारी अध्यक्ष

### शरद पवार यांची मोठी घोषणा



नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी ही घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे यापुढे काम पाहणार आहेत. दोघांकडे देखील वेगवेगळ्या राज्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा या राज्यांची जबाबदारी सुप्रिया सुळे यांच्याकडे देण्यात आली आहे. तर प्रफुल्ल पटेल यांच्याकडे मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, झारखंड या राज्याची जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिल्ली येथील वर्धपान कार्यक्रमात शरद पवारांनी ही घोषणा केली आहे.

प्रफुल्ल पटेस, सुप्रिया सुळे यांच्या। पान २ वर

अजित पवार यांनी म्हटले की, प्रफुल पटेल आणि मी एकाच वर्षी खासदार झालो. सुप्रिया सुळे या अनेक वर्ष दिल्लीत आहेत. माझ्यावर राज्याच्या विरोधी पक्षाची जबाबदारी आहे. ती मी पार पाडत असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. आपल्याला महाराष्ट्रातल्या राजकारणात रस आहे. आता, स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का? असंही त्यांनी म्हटले. राष्ट्रवादी काँग्रेसला आज २४ वर्ष पूर्ण झाली. या २४ वर्षात पहिल्यांदा मी दिल्लीला गेलो. कोणी कोणाला शह देत नाही. आमच्या पक्षातंर्गत प्रश्न आहे, इतर कोणी नाक खुपसण्याचे कारण नाही असेही अजित पवार यांनी म्हटले. पवार एका पक्षाचे राष्ट्रीय नेते आहेतं ते त्यांचं आणि फडणवीस त्यांचं मत व्यक्त करतात. प्रत्येकाला आपापल्या प्रश्न मांडायचा अधिकार आहे. कोणी काय म्हणाल म्हणून नाराज व्हायचं कारण नाही, असेही पवार यांनी म्हटले.



## तुळजाभवानी देवीच्या दानपेटीत आढळले ३५४ हिरे!



तुळजापूर : महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तिजोरीतील सोने-चांदीचे गेल्या २ दिवसांपासून मोजमाप सुरू आहे. तब्बल १५ वर्षांनंतर भाविकांनी तुळजा भवानी देवीला अर्पण केलेल्या दागिन्यांचे मोजमाप सुरू आहे. दरम्यान, या ऐवजाच्या मोजमापादरम्यान एक आश्चर्यकारक घटना घडली आहे, दागिन्यांचे मोजमाप सुरू असताना ३५४ हिरे भक्ताने दान केल्याचे समोर आले. या ३५४ हिऱ्यांची किंमत अंदाजे ३० ते ४० कोटी असल्याचं सांगण्यात येत आहे. परंतु, इतक्या प्रमाणात हिरे एका भाविकाने दान केले की अनेक भाविकांनी याची माहिती अद्याप समोर आली नाही.

तुळजाभवानी मंदिरात दान अर्पण करण्याची एक पद्धत आहे. भाविक एका पाकिटामध्ये बंद करुन सोने-चांदीचे दागिने किंवा हिरे दानपेटीत टाकतात, त्यामुळे हे हिरे एकाच। पान २ वर

## देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्रातून ४५ जागा जिंकण्याचा निर्धार



नांदेड : भाजपने लोकसभा निवडणूकीसाठीचे रणशिंग फुंकले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून ४५ जागा जिंकण्याचा निर्धार केल्याची घोषणा अमित शाह यांनी आज केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांची नांदेडमध्ये जाहीर सभा झाली. अमित शाह यांच्या भाषणाआधी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. त्यावेळी त्यांनी काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली. देवेंद्र फडणवीस यांनी मोदी सरकारच्या माध्यमातून गेल्या ९ वर्षात किती चांगली कामे झाली याचे विषण केले. त्यानंतर अमित शाह यांनी भाषण केले. । पान २ वर

## बोगस बियाणे विकणाऱ्यांना १० वर्षांची शिक्षा, कृषी मंत्र्यांची मोठी घोषणा

### येत्या अधिवेशनात कायदा आणला जाणार



मुंबई :पेरणीच्या हंगामात अनेकदा शेतकऱ्यांना बोगस बियाणे देऊन त्यांची फसवणूक करण्यात येत असल्याच्या अनेक घटना सातत्याने समोर येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची बियाणेच्या बाबतीत होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आता शिंदे-फडणवीस सरकराने मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे बोगस बियाणे विकणाऱ्यांना १० वर्षांची शिक्षा होणार असून, यासाठी येत्या अधिवेशनात कायदा आणला जाणार असल्याची घोषणा कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली आहे. अकोल्यातील दैनिक लोकमतच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त होत असलेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी बोलतांना कृषीमंत्री सत्तार यांनी ही घोषणा केली आहे. । पान २ वर

## कुस्तीपटूंचा सरकारला अल्टिमेटम! ...

### तोपर्यंत आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार नाही : साक्षी मलिक



नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून कुस्तीपटूंचं आंदोलन सुरु आहे. या कुस्तीपटूंनी आता सरकारला अल्टिमेटम दिला आहे. जोपर्यंत कुस्तीपटूंचे प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत आशियाई खेळात सहाभागी होणार नाही, असं वक्तव्य साक्षी मलिक हिनं केलं आहे. भाजपचे खासदार आणि कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्याविरोधात लैंगिक शोषणाचा आरोप काही महिला कुस्तीपटूंनी केला आहे. त्यामुळे बृजभूषण सिंह यांच्या अटकेची मागणी कुस्तीपटूंकडून करण्यात येत आहे.

कुस्तीपटू साक्षी मलिकने सांगितलं की, ती आणि बजरंग पुनिया आणि विनेश फोगाट यांच्यासह इतर दोन कुस्तीपटूंच्या समस्यांचं निराकरण झाल्यानंतरच आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होतील. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्या विरोधातील लढा कायम राहील, । पान २ वर

## संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं आज प्रस्थान



पुणे : आज संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्यासाठी अलंकापूरी सजली आहे. इंद्रायणीच्या काठावर हजारो वारकरी दाखल झाले आहेत. याच वारकऱ्यांच्या टाळ मृदुंगाच्या गजरात आज पालखी प्रस्थान सोहळा पार पडणार आहे. तर पायी प्रवास करुन २८ जूनला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचेल आणि २९ जूनला संत ज्ञानेश्वर माऊलींची विठुरायांशी भेट घडेल. वारकरी संप्रदायाला याच क्षणाची आस लागलेली असते. देवस्थानने त्याच पायी वारीची घोषणा केल्याने वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३३८ वे वर्ष आहे. या पालखी सोहळ्याची हजारो विठ्ठल भक्त प्रतिक्षा करत असतात.

कसा असेल दिनक्रम?

पहाटे ४ वाजता – घंटानाद

पहाटे ४:१५ वाजता – काकड आरती

पहाटे ४ :१५ ते ५: ३० वाजता – पवमान अभिषेक, पंचामृत पूजा आणि दुधारती

सकाळी ५ ते ९ वाजता – श्रींच्या चलपादुकांवर भक्तांची महापूजा

सकाळी ६ ते १२ वाजता – भाविकांना श्रींचे समाधी स्पर्श दर्शन, किर्तन, विणामंडप

दुपारी १२ ते १२:३० वाजता – गाभारा स्वच्छता, समाधीवर पाणी घालणे आणि महानैवेद्य

दुपारी १२:१ वाजता – भाविकांना समाधीचं दर्शन

सायंकाळी ४ वाजता – पालखीचं प्रस्थान होईल

। पान २ वर

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली मंदिर, परिसराची पाहणी

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमिवर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर, शहर व परिसरात भाविकांना देण्यात सोयी सुविधांचा आढावा घेण्यासाठी महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मंदिर व परिसर, महाद्वार चौक, नदीपात्र, पत्रा शेड, ६५ एकरची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी त्यांच्यासमवेत खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार समाधान आवताडे, विभागीय आयुक्त सौरभ राव, प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसीलदार सुशील बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी आदिंसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.आषाढी वारीमध्ये प्रथा परंपरेप्रमाणे पादुका स्नानाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने महाद्वार घाटावरून नदीपात्रात या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पोलीस प्रशासनाने घाटावरील गर्दीचे योग्य नियोजन करावे. तसेच महाद्वार घाटावरील अडथळादायी वायर्सच्या पार्श्वभूमिवर आवश्यक ती दक्षता घ्यावी. मंदिर परिसरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत, जेणेकरून भाविकांना अडथळा येणार नाही, असे ते म्हणाले.चंद्रभागा नदीपात्रातील पाणी स्वच्छ रहावे, यासाठी आषाढी एकादशीपूर्वी ७ दिवस पाणी सोडण्याच्या सूचना संबंधितांना करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, चंद्रभागा नदी पात्रातील खड्डे बुजवावेत. नदी पात्रात धोक्याच्या ठिकाणी बॅरिगेट्स तसेच धोक्याच्या ठिकाणाची माहिती देणारे फलक लावावेत. नदीपात्र वेळोवेळी स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी, असे ते म्हणाले.

मंदिराभोवती पत्र्याचा निवारा शेड करण्याच्या, आवश्यकतेनुसार पंखे लावण्याच्या सूचना करून पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले दर्शन रांग अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने गरजेनुरूप खाजगी जागेवर मांडव उभा करून भाविकांची व्यवस्था करावी व त्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध कराव्यात. दर्शन रांगेत गर्दी न करता मोकळे वातावरण राहील याबाबतची व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

वारी कालावधीत भाविकांना सुलभ दर्शन घडावे, यासाठी मंदिर समितीने आवश्यक नियोजन करावे. दर्शन रांग व दर्शन मंडपात स्वच्छता राखावी तसेच मॅटची व्यवस्था करावी. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे सांगून श्री, विखे पाटील यांनी गर्दी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने पत्राशेडच्या ठिकाणी मोकळ्या जागेत मंडप उभा करावा, यामुळे वारकरी भाविकांबरोबरच अधिकारी, कर्मचारी, भोजन



व्यवस्था देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सावली मिळेल, शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. तसेच त्याठिकाणी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना केल्या.यंदा प्रथमच मानाच्या

## ✻ सुविचार ✻

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

# संपादकीय

## सन्मान राखला जाईल..

आरोपीने मुलीचा खून केला आणि त्या निर्जीव शरीरावर अत्याचार केला. सत्र न्यायालयाने आरोपीला खून आणि अत्याचाराची शिक्षा दिली. सर्वोच्च न्यायालयाने आरोपीची खुनाची शिक्षा कायम केली. मात्र, अत्याचाराची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली. कारण मृतदेहावर अत्याचार केल्यास शिक्षा ठोठावणारा कोणताच कायदा नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचसोबत मृतदेहावर अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा ठोठावण्यासाठी कायदा करा किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्यात तशी तरतूद करून घ्या, असेही न्यायालयाने केंद्र सरकारला सांगितले आहे. हत्या, मारहाण, अत्याचार, विनयभंग यापासून प्रत्येक हिंसाचाराला शिक्षा देण्याची तरतूद कायद्यात आहे हे नव्याने सांगायला नको. प्रत्येकवेळी कायद्याची कठोर अंमलबजावणी होतेच असे नाही. आज कित्येक पीडित न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत, तर किती निष्पाप शिक्षा भोगत आहेत. असे असले तरी कायद्याचा धाक हा हवाच. तरच गुन्हांना आळा बसू शकणार आहे. कारण मृतदेहावर अत्याचार करणे ही विकृती कोणी सहन करू शकणार नाही. माणूस मारल्यानंतर मृतदेहाचे तुकडे करणे, त्याचे शिर वेगळे करणे अशा घटना घडतच असतात. अगदीच याचे ताजे उदाहरण बघायचे झाले तर श्रध्दा वालकरची हत्या अंगावर काटा आणणारी आहे. पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपी आफताबने श्रध्दाचे तुकडे करून ते वेगवेगळ्या ठिकाणी टाकले होते. तिचे मुंडके फ्रिजमध्ये ठेवले होते. संविधानाने चौकटच अशी भक्कम करून ठेवली आहे की न्याय हा होतोच. उशीर होणे, पदरी निराशा पडणे या गोष्टी घडतच असतात. म्हणून कोणी जगणे सोडत नाही. आज एका भयानक विकृतीची घटना समोर आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तातडीने केंद्र सरकारला सूचना केली की मृतदेहावर अत्याचार करणाऱ्याला शिक्षा ठोठावणारा कायदा करा किंवा आता असलेल्या कायद्यात तशी तरतूद करा. अशी घटना अपवादात्मक घडेल असाही एक कल असेल. घडेल ही शक्यता नाकारता येणार नाही. तेव्हा केंद्र सरकारने यासाठी कायदा करून किमान मृतदेहाला न्याय मिळेल आणि त्याचा सन्मान राखला जाईल, अशी तरतूद करावी एवढीच अपेक्षा.

# संस्कृत महाराष्ट्रात विकृत कृत्य

देशामध्ये महाराष्ट्राला एक आगळी वेगळी ओळख आहे. फुले शाहू आंबेडकर विचारधारा व संत तुकाराम महाराजांपासून संत गाडगेबाबा पर्यंत संतांची परंपरा या स्वराज्यात निर्माण झाली. फुले शाहू आंबेडकर विचार धारा ही संतांच्या विचारावरच असून समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य यावर आधारित आहे. संतांचा लढा हा विषमता, अंधश्रद्धा, धर्माच्या नावाखाली लूट याला मातीत गाढून सामाजिक समता विज्ञान यावर आधारित होता. संतांनी धर्माला महत्व न देता कर्माला महत्व देऊन मानवता धर्म जोपासला. कोणत्याही प्रकारचा भेद, विषमता व द्वेष याला थारा न देता केवळ आणि केवळ माणसाला माणूस म्हणून माणसाची सेवा करणे यालाच प्राधान्य दिले. संतांची व महापुरुषांची शिकवण एकी व समतेवर आधारित असून विषमता व द्वेषाला थारा नाही. अनेक संतांनी देव दगडात व देवळात नसुन तो मानसात आहे. आणि मानवांची सेवा हिच ईश्वर सेवा असे सांगितले असतानाही आजही जिवंत माणसाला जाती धर्माच्या नावाखाली मारले जाते. सामाजिक द्वेष पसरवून माणसाला माणसापासून दुर केले जाते. हे कृत्य संतांच्या विचारधारेत बसतच नाही. आज कर्माला नाही धर्माला महत्व दिले जाते. इतिहासाची चुकिचे दाखले देऊन वर्तमानात सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण करून सर्वसामान्य तरुणांचे भविष्य उद्धस्त केले जाते याची जाणीवच राहीली नाही. स्वतः ला माणूस म्हणून घेताना प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या संताचा किंवा कोणत्या ना कोणत्या महापुरुषांचा आदर करून त्यांना मानतो. परंतू खंत आहे की जे काही आज घडत आहे यावरून असे दिसत आहे कि जे लोक वैचारिक पणे संत व महापुरुषांचे विचार स्वतः स्विकारतात व त्याचा प्रचार आणि प्रसार करून समजामध्ये प्रबोधनाच्या माध्यमातून समजात समता बंधुता व शांतता प्रस्थापित करतात अशा लोकांना प्रकाशझोतात आणले जात नाही. जे लोक धर्मापेक्षा कर्माला महत्त्व देऊन असत्य थोतांड अंधश्रद्धा व देवाधर्माच्या नावावर पोटभरणाऱ्या लोकांना विरोध करतात त्या लोकांचे विचार व कार्य जास्त लोकांपर्यंत पोहचु दिले जात नाही. परंतू जनता जागृत होऊन सत्य असत्य यामधला फरक व धर्माच्या नावाखाली केवळ राजकारण करून लोकांच्या समस्या वाढवल्या जात आहेत याची जाणीव झालेली आहे. परंतु अशा लोकांना मर्यादित केले जाते. धर्मद्रोही म्हणून त्यांची टिंगलटवाळी केली जाते. आज सत्य बोलणे गुन्हा होत चालला आहे. सरकार आपल्या अधिकाराचा गैरवापर करून सामाजिक तेढ निर्माण होणाऱ्या बाबींना प्राधान्य देऊन सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठी हातभार लावते. कोणत्याही चुकिच्या गोष्टी चे समर्थन कोणताही जागृत व मेंदुचा वापर करणारा व्यक्ती करत नाही. हे सत्य असताना केवळ धर्माच्या बेगडी स्वाभिमान दाखवून इतरांना तुच्छ लेखणे किंवा अत्याचाराचे समर्थन करणे हे सुसंस्कृत पणाचे लक्षण नाही. सामाजिक तेढ किंवा समाजीक द्वेषाची जाणीव आपल्याला दैनंदिन जिवन जगत असताना होत नाही. परंतु इलेक्ट्रॉनिक मिडीया बघितला तर मग आपल्याला धर्म धोक्यात वाटतो, मुस्लिम देशद्रोही वाटतो, लव जिहाद ज्वलंत प्रश्न वाटतो. आणि या विषयावर भावनिक करून शिक्षण रोजगार महागाई व आरोग्य यावरून दुर्लक्ष करून धर्मच जगला पाहिजे त्या साठी काही झाले तरी चालेल असे वातावरण निर्माण केले जाते. जेव्हा जेव्हा धार्मिक दंगली होऊन सामाजिक वातावरण दुषीत झाले तेव्हा तेव्हा कोणत्याही धर्माला कधीच कोणताच फायदा झाला नाही. उलट दोन्ही धर्मातील तरुणांवर केसेस दाखल होऊन त्यांचे भविष्य उध्वस्त झाले. आणि ज्यांना दंगलीचा फायदा झाला त्या लोकांची मुले ना दंगलीत असतात ना त्यांच्यावर केसेस होत ना ते बेरोजगार असतात. ज्यांना दंगलीचा फायदा व धर्माचा फायदा होतो त्यांची लेकरं विदेशात शिक्षणासाठी जातात. आणि गावातील शाळा बंद करून सर्वसामान्य लोकांच्या हाती दगड, तलवार चाकु बंदुक आणि डोक्यात बेगडी धर्म देऊन जिवनाची राग रंगोळी केली जाते. तरीही लोकांना याची जाणीव राहली नाही. ज्यांना जाणीव आहे त्यांचे हे लोक ऐकतही नाहीत. प्रामाणिक पणा, इमानदारी, सत्यता ह्या गोष्टी तर लोकांच्या डोक्यातून काढून घेऊन केवळ आणि केवळ धर्म आणि धार्मिक तेढ एवढ्याच गोष्टी मेंदुवर बिंबवल्या गेल्या आहेत. म्हणून सामाजिक प्रश्न जसे शिक्षण, नोकरी, महागाई, आरोग्य, राष्ट्रप्रेम, महापुरुषांचे विचार याचे धर्मांध व भक्त लोकांना काहीच घेणे देणे नाही. मुळात हे धर्मांध व भक्त लोक संख्येने खुप कमी आहेत. परंतु इलेक्ट्रॉनिक मिडिया वारंवार त्यांनाच व त्यांच्या मेंदुला खुराख पुरेल अशाच बाबी दाखवते म्हणून त्यांची संख्या जास्त वाटते. धर्मांध व भक्त लोकांच्या कोणत्याही कृत्याला प्राधान्य देऊन दाखवले जाते म्हणून सामाजिक तेढ दिसते. कधी कधी तर इलेक्ट्रॉनिक मिडियाच अगोदर स्टुडिओ मध्ये सामाजिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य करते त्यानंतर समाजात त्याचे पडसाद उमटले जातात. सुप्रीम कोर्टाने मिडियाने धार्मिक तेढ निर्माण करू नये असे बजावले असतानाही मिडिया सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करून आपली लाचारी व बेईमानी वेळोवेळी सिद्ध करते. नोकरी साठी शिकवलेल्या व पुस्तकाचा कधीच संबंध न आलेल्या लोकांना येथे इलेक्ट्रॉनिक मिडिया विद्वान म्हणून समोर आणते. भोंदुगीरी पाखंड विषमता यांना प्रोत्साहन दिले जाते म्हणून त्या प्रवृत्तीचे लोक कमी जरी असले तरीही जास्त दिसतात. देशात राहतांना समता बंधुता व शांतता प्रस्थापित कशी होईल याचे उत्तर भारतीय संविधान व संतांचे विचार यामध्ये आहे. पण मुळात प्रश्न हा आहे की भक्त व धर्मांध लोक कधी वाचत नाहीत. स्वतः ला एक भारतीय म्हणून समजून इतरांना पण भारतीय समजले आणि दैनंदिन जिवन जगले तर प्रत्येक धर्माला आदराने व नियमाने जगता येते. आम्हाला देशावर प्रेम असायला पाहिजे पण प्रेम हे धर्माच्या नावाखाली चुकीच्या कामावर आहे म्हणून विकृती वाढत आहे. कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे कोणत्या गोष्टी मानव हिताच्या देशहिताच्या आहेत यावर धर्मांध, विषमतावादी लोक चर्चाच न होऊ देता केवळ द्वेष पसरवण्याचे काम करतात. प्रत्येक बाबीमध्ये जात आणि धर्म शोधण्याचा प्रयत्न करतात. आणि जेव्हा स्वतः च्या जाती धर्मावर आरोप होतात तेव्हा राष्ट्रहीताच्या गोष्टी करतात. एवढे माणसिक अपंग लोक आहेत. सध्या औरंगजेबाच्या फोटो वरून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. औरंगजेबाचा फोटो वापरणे चुकिचेच आहे. यात काहीही दुमत नाही.परंतु केवळ औरंगजेब मुस्लिम होता म्हणून द्वेष करत असाल तर हा मुर्ख पणा आहे. शत्रुच्या कबरा बांधणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज समजून घेणे अगोदर आवश्यक आहे. औरंगजेब यांच्या फोटो मुळे जर धार्मिक वातावरण बिघडत असेल आणि धर्म धोक्यात येत असेल तर फोटो ला विरोध व्हायलाच पाहिजे. परंतु फक्त एवढ्यावरच थांबुन जमणार का? डॉ. बाबासाहेब यांची जयंती साजरी केली म्हणून तरुणांची हत्या केली जाते, मुंबई मध्ये मुलीवर बलात्कार करून हत्या केली जाते. रेणापूर मध्ये तिन हजारासाठी खुन केला जातो. मुंबई मध्ये महिलेचे तुकडे करून कुकर मध्ये शिजवून, मिस्कर ने बारीक केले जाते तेव्हा कोणत्या धर्माला गर्व वाटतो? औरंगजेब फोटो प्रकरणात बोलणारे व रस्त्यावर येणारे वरिल प्रकरणात गप्प का बसतात? धर्म म्हणजे नेमकं काय? फोटो दाखवणे जास्त गंभीर आहे का व्यक्तीची हत्या करणे जास्त गंभीर आहे? हत्येचा निषेध आणि आरोपींना शिक्षा व्हायला पाहिजे या साठी जे लोक रस्त्यावर येत नसतील ते कोणत्या धर्माचे? मानवता प्रामाणिक पणा शिल्लक आहे का?

धर्माच्या नावाखाली आरोपींना वाचवणे योग्य आहे का? फोटोवरून वादळ निर्माण करणारे धर्मांध लोक वरिल आरोपींच्या विरोधात कधी आवाज उठवणार. याच मातीत संतांनी समतेची पेरणी केली परंतु जातीवादी, विषमतावादी स्वार्थी राजकारण्या लोकांनी संतांचे विचार पायदळी तुडवून द्वेष विषमता, पसरवून धार्मिक व सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि लोक त्यांना समर्थन करतात हे माणसिक गुलामीचे लक्षण होय. संत महापुरुषांनी समता बंधुता शांतता प्रस्थापित होण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घालून सुसंस्कृत होण्यासाठी वैचारिक संस्कार घातले परंतु लोभी, पाखंडी लोकांनी ते संस्कार झुगारून विकृती पसरवणारे संस्कार स्विकारून आपले चुकीचे संस्कार, बेईमानी, धर्मांध व विषमतावादी विचार दाखवत आहेत. हि विकृती नष्ट करण्यासाठी पुन्हा प्रबोधनाची मशाल पेटवणे आवश्यक आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## अमित शाह यांच्याकडून मुस्लीम

मी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानतो. मोदींच्या नेतृत्वावरील तुमचा पाठिंबा आणि विश्वास यामुळेच भाजपला पूर्ण बहुमत मिळू शकले आणि नऊ वर्षांचे सरकार यशस्वीपणे पूर्ण करण्यात आणि देशात सुधारणा आणि विकास घडवून आणण्यात मदत झाली, असे अमित शाह म्हणाले. रॅलीत शाह यांनी लोकांना राहुल गांधी किंवा नरेंद्र मोदी कोण पंतप्रधान म्हणून हवा आहे, असा सवाल केला.

## प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे ..

नावाची घोषणा करताना सुनील तटकरे आणि जितेंद्र आव्हाड यांना देखील जबाबदारी देण्यात आली आहे. सुनील तटकरे यांच्याकडे ओडिशा, पश्चिम बंगाल, शेती, अल्पसंख्याक या विभागांची जबाबदारी देण्यात आली आहे. तर जितेंद्र आव्हाडांनी बिहार, छत्तीसगड, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, कामगार या विभागांची जबाबदारी देण्यात आली आहे. अजित पवारांना मात्र कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नाही. अजित पवार या घोषणेवेळी दिल्लीत उपस्थित होते.

शरद पवारांनी चेंबूर येथील सभेत पवारांनी भाकरी फिरवण्याची वेळ आलीय जर ती वेळीच फिरवली नाही तर करपू शकते असं म्हणत एक इशारा दिला होता. त्यानंतर 'लोक माझे सांगाती' याच्या सुधारीत आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा देत असल्याची घोषणा केली होती. शरद पवारांच्या घोषणेनंतर सभागृहात एकच गदारोळ झाला. तरुण कार्यकर्त्यांचे सलग आंदोलन, देशभरातील विरोधी पक्षाच्या बड्या नेत्यांची विनंती यानंतर शरद पवारांनी राजीनामा मागे घेण्याचा निर्णय घेतला.

## बोगस बियाणे विकणाऱ्यांना ..

दरम्यान यावेळो बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले की, ज्यांच्याकडे बोगस बियाणे असतील, ज्यांच्याकडे बोगस औषधे असतील, किंवा खते असतील त्यांनी तत्काळ नष्ट करावे. अन्यथा राज्यपाल यांच्याकडे मी पूर्ण रिपोर्ट देणार असून, त्यांच्यावर अंतिम निर्णय झाल्यावर त्या बोगस माल विकणाऱ्यांवर किमान १० वर्षांची शिक्षा झाली पाहिजे असा कायदा येत्या अधिवेशनात आणला जाणार असल्याचे सत्तार म्हणाले आहेत. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी एक दिवस बळीराजासाठी आम्ही उपक्रम राबवला. ज्यात राज्यातील १६ हजार शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची अडचण समजून घेतली. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत शेतकऱ्यांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो याचा अभ्यास केला. दरम्यान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आम्ही खरीप हंगामाची आढावा बैठक आयोजित केली होती. यावेळी अकोला, जालना, परभणी जिल्ह्यातील आमच्याकडे तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे आमच्या अधिकाऱ्यांनी ८७ ठिकाणी छापेमारी केली, ज्यात ६८ ठिकाणी अनियमितता आढळून आली. तर काही ठिकाणी आमचे अधिकारी पैसे घेत असल्याचे बातम्या आल्या. मी पोलिसांना फोन करून कारवाईत सहभागी होण्याच्या सूचना दिल्या. तसेच आमच्या कोणत्याही अधिकाऱ्याने पैसे घेतले असल्याचे आढळून आल्यास त्याची तक्रार जिल्हाधिकारी किंवा एसबीकडे करावी असेही सत्तार म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून एक प्रस्ताव राज्यपाल यांच्याकडे घेऊन जाणार आहे. पोलीस, महसूल आणि कृषी विभाग या तिघांचा दोन महिन्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आला पाहिजे. यामुळे बोगसगिरी करणारे सर्व समोर येतील. मी कृषीमंत्री किती दिवस राहिल माहित नाही. पण मंत्री असून देखील आपण काहीच केले नाहीतर शेतकरी आपल्याला माफ करणार नाही, असेही सत्तार म्हणाले.

## तुळजाभवानी देवीच्या..

भविकाने दिली किंवा नेमके किती भाविकांनी दिले, याचा आकडा अद्याप समोर आला नाही. एवढ्या प्रमाणात देवीच्या दानपेटीत हिरे सापडणं सर्वांना आश्चर्यचकित करुन टाकणारं आहे, कारण याआधी तिरुपती मंदिर, शिर्डीचं साईबाबा मंदिर आणि सिद्धीविनायकला इतक्या प्रमाणात दान केलेलं आपण पाहिलं असेल, पण तुळजा भवानी मंदिरात इतक्या प्रमाणात हिऱ्यांच्या दानाची ही पहिलीच घटना असेल.त्यात हे निदर्शनास आलेले ३५४ हिरे आकाराने छोटे असले तरी त्यांचे मूल्य अंदाज ३० ते ४० कोटी असल्याचं सांगण्यात येत असल्याने हे आणखी आश्चर्यकारक आहे. हे दान नेमकं केलं कोणी? याची माहिती समोर आली नाही. कदाचित सीलबंद पाकिटात भाविकाने दान केल्याने हे नजरेत आलं नसावं किंवा पाकिट सीलबंद असल्याने दानाची नोंद देखील करण्यात आला नसावी.तुळजाभवानी देवीला नवसपूर्ती म्हणून अनेक भाविक सोने-चांदीच्या स्वरूपात दान अर्पण करतात. १५ वर्षांनंतर सुरू करण्यात आलेली तिजोरीतील दान केलेल्या ऐवजाची मोजणी अजून महिनाभर चालणार आहे. आगामी एक महिन्यात जवळपास २०० किलो सोने आणि ४ हजार किलो चांदीचे मोजमाप करण्यात येणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे, त्यानंतर त्यांची शुद्धता तपासणी होणार आहे.

## देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्रातून

अमित शाह यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक करत असताना मोठा दावा केला.

देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचा संकल्प केला आहे, असे मोठे वक्तव्य अमित शाह यांनी केले. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राला विकासात पुढे आणण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले, अशा शब्दांत अमित शाह यांनी उपमुख्यमंत्र्यांचे कौतुक केले.

सर्वात आधी शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करुयात. मी आज नांदेडच्या पवित्र भूमीत आलो आहे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचा ३५० वं वर्ष आहे. मी शिवरायांना प्रणाम करून माझ्या भाषणाला सुरुवात करतो. नांदेडच्या भूमीला गुरुगोविंद सिंह यांनी आशीर्वाद दिला आहे. मी त्यांच्या पुण्यस्मृतींना नमस्कार करतो, अशी सुरुवात अमित शाह यांनी केली.

मराठवाड्याचा प्रांत एकेकाळी हैदराबादचा भाग होता. पण नांदेड आणि मराठवाड्याला देशाला स्वातंत्र्य मिळालेला नव्हता. इथल्या जनतेला अमानुष राजवटीचा सामना करावा लागला. १७ सप्टेंबर १९४८ ला स्वातंत्र्य मिळाले होते, असे शाह म्हणाले.

भाजपचे सरकार आणि मोदींच्या नेतृत्वातील सरकारने आज नऊ वर्ष पूर्ण केले आहेत. मी नांदेड आणि महाराष्ट्राच्या जनतेचा धन्यवाद बोलायला आलो आहे. महाराष्ट्राच्या जनतेने खुल्या मनाने भाजपला मतदान केले होते. मोदी सरकारचे ९ वर्ष हे भारत गौरव, विकासाचे ठरले आहेत. हे वर्ष गरीब कल्याणाचे वर्ष ठरले आहे. १० वर्षांच्या काँग्रेस सरकारनंतर मोदी सरकार आले तेव्हा सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडवण्यात आले, असेही अमित शाह म्हणाले.

सोनिया-मनमोहन सरकारमध्ये शरद पवार हे देखील होते. हे सरकार सर्वात भ्रष्ट सरकार होते. १२ लाख कोटींचा भ्रष्टाचार केला. गेल्या ९ वर्षात आमचे विरोधक आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू शकले नाहीत. आधी देशात बॉम्बस्फोट व्हायचे. त्यावेळी मनमोहन सिंह यांच्या मुखातून शब्द निघायचे नाही. पण मोदींनी सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करत पाकिस्तानला घरात घुसून मारले. नरेंद्र मोदी सरकारच्या कार्यकाळात गरीब कल्याणाची कामे झाली, असेही अमित शाह आपल्या भाषणात म्हणाले.

## कुस्तीपटूंचा सरकारला अल्टिमेटम

असं सांगितलं आहे. आंदोलक कुस्तीपटूंनी शेतकरी, खाप आणि कर्मचारी संघटनांच्या बैठकीत शनिवारी सांगितलं की, सर्व प्रश्न मार्गी लागल्यानंतरच कुस्तीपटू आशियाई स्पर्धेत सहभागी होतील. आशियाई क्रीडा स्पर्धा २३ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान चीनमधील हांगझोऊ येथे होणार असून ३० जूनपूर्वी संघ निवड होईल. त्याआधी सरकारने हा प्रश्न आणि कुस्तीपटूंच्या मागण्या मार्गी लावाव्या अशी, कुस्तीपटूंनी मागणी केली आहे.

आंदोलक कुस्तीपटूंनी तूर्तास आंदोलन स्थगित केलं आहे. केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी आंदोलक कुस्तीपटूंसोबत चर्चा केली होती. तब्बल सात तासांच्या चर्चेनंतर अनुराग ठाकूर यांना कुस्तीपटूंना आश्वासन दिलं आहे. १५ जूनपर्यंत चौकशी करुन आरोपपत्र दाखल करु असं आश्वासन अनुराग ठाकूर यांनी कुस्तीपटूंना दिलं. त्यानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय कुस्तीपटूंनी घेतला.

## संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं

सोहळ्यात श्रींचा पालखी सोहळा पुण्यनगरीत दोन दिवस पाहुणचार घेत १४ जूनला सासवड मुक्कामास दिवे घाटातून हरिनाम गजरात मार्गस्थ होईल. १४ आणि १५ जूनला सासवड मुक्काम करेल. १६ जूनला जेजुरीकडे प्रस्थान, १७ जूनला जेजुरीला मुक्कामी असेल. १८ जूनला लोणंद येथे सोहळा विसावेल. १९ जूनला अधिक एक दिवसाचा मुक्काम आणि २० जूनला तरडगाव, २१ जूनला फलटणकडे प्रस्थान करेल. २२ जूनला पालखीचा फलटणमध्ये मुक्काम असेल. २३ जूनला नातेपुते, २४ जूनला माळशिरस मुक्काम, २५ जूनला वेळापूर, २६ जूनला भंडी शेगाव, २७ जूनला वाखरी, २८ जूनला पंढरपूर, २९ जूनला आषाढी एकादशी सोहळा साजरा होईल. पालखी सोहळ्यात फलटन येथे २१ जून, बरड येथे २२ जूनला एक दिवसांच्या मुक्कामासाठी सोहळा विसावणार आहे. २१ जूनला फलटणकडे प्रस्थान आणि मुक्काम होईल. २२ जूनला बरड मुक्काम असेल.

# सुंदर मी होणार

रोजच्या धावपळीत आणि वाढत्या ताण-तणावात स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देणंही अनेकांना शक्य होत नाही. मग तिथं सौंदर्याचा विचार कधी करणार? पण दोस्तांनो, सुंदर दिसण्यात त्वचेच्या सौंदर्याचा भाग महत्त्वाचा ठरतो आणि काही साध्या-सोप्या उपायांनी तुम्ही त्वचेला उजाळा देऊ शकतात. त्यासाठी काय करावं, जाणून घेऊस्वत:च्या प्रकृतीची पुरेशी काळजी घेणं होत नाही, अशी परिस्थिती आहे. सतत कार्यरत राहणं ही या काळाची गरज आहे. त्यासाठी तुमच्या शरीराची तसंच मनाची पुरेशी तयारी असण्याची आवश्यकता आहे. मात्र, तेवढ्यानं भागतं असं नाही. सोबत तुमचं व्यक्तिमत्त्वही आकर्षक, प्रभावी असायला हवं. साहजिक सुंदर दिसण्यासाठी प्रयत्न गरजेचे ठरतात. शारीरिक सौंदर्यात त्वचेच्या सौंदर्याचा भाग महत्त्वाचा असतो. त्यामुळे त्वचा तजेलदार राहील, तिच्यावर सुरकुत्या असणार नाहीत वा डाग असणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागते. आता त्यासाठी काही खास प्रयत्न करावे लागणार का, असा प्रश्न अनेकांच्या मनात आला असेल. परंतु दोस्तांनो काही साध्या-सोप्या उपायांनी तुम्ही त्वचेचं सौंदर्य वृद्धिंगत करू शकता.

✻ क्लिंजींग - रोजच्या धावपळीमध्ये चेहऱ्यावर जमा झालेली धूळ आणि इतर अशुद्धी घालवण्यासाठी सॅलिसिलिक ॲसिड किंवा ग्लायकोलिक ॲसिड असलेल्या उत्पादनांचा वापर अवश्य करायला हवा. यामुळे तुमचा चेहरा पूर्णपणे स्वच्छ होण्यास मदत होते. साहजिक चेहऱ्याची चमक वाढते.✻ हायड्रेटिंग - त्वचा धुवून कोरडी केल्यानंतर पुन्हा अधिक कोरडी होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन त्वचेचा ओलावा कायम ठेवणाऱ्या क्रिमचा वापर करावा. त्वचा तेलकट असेल तर ऑईल बेस प्रॉडक्ट वापरण्याचं टाळायला हवं.✻ ऍक्ने कमी करा - बऱ्याच जणांना वरचेवर ऍक्नेचा त्रास होत असतो. मुख्यत्वे चेहऱ्यावरच्या तैलग्रंथी जास्त प्रमाणात स्त्रवल्यास त्या ठिकाणी ऍक्नेचा त्रास होतो. अशा वेळी बेंझॉईल पेरॉक्साईडचा वापर ऍक्नेचा त्रास कमी करण्यास मदत करणारा ठरतो. त्यासाठी थोडंसं बेंझॉईल पेरॉक्साईड अक्ने प्रभावित क्षेत्रावर लावल्यास दिवसेंदिवस त्याचा प्रभाव कमी होत जातो. अक्नेने प्रभावित झालेल्या क्षेत्रावर ऑईल बेस क्रीमचा वापर टाळणंही हिताचं ठरतं.✻ संरक्षण - त्वचेच्या काळजीमधला सर्वात शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे संरक्षण. त्यासाठी त्वचेचं धूळ आणि उन्हापासून होता होईल तितकं संरक्षण करायला हवं. त्यासाठी झिंक ऑक्साईडची मात्रा असलेलं सनस्क्रीन लोशन वापरणं हा मार्ग उपयुक्त ठरतो.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते आरोग्यवारी अभियानाचा शुभारंभ




पुणे/प्रतिनिधीः संतांनी माणसातला देव ओळखण्याचा संदेश मानवजातीला दिला असून आरोग्यवारीच्या माध्यमातून माणसातल्या ईश्वराची सेवा घडते, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

निवडुंग विठोबा मंदिर येथे राज्य महिला आयोग आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्यवारी अभियानाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार रविंद्र धंगेकर, मनपा अतिरिक्त आयुक्त रविंद्र बिनवडे, महिला आयोगाच्या सदस्य संगिता चव्हाण, प्रशांत जगताप आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, राज्य महिला आयोगाने अतिशय संवेदनशीलतेने हा उपक्रम सुरू केला आहे. मासिक पाळीसारख्या विषयाकडे बघण्याच्या समाजाच्या दृष्टिकोनामुळे याबाबतची समस्या मांडताना मनात संकोच असतो. त्यामुळे महिलांची ही समस्या लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या सहकार्याने सुरू केलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. समाजाच्या सहकार्याने शहरात अनेक ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणारे यंत्र बसविण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

पुणे शहरात जागा उपलब्ध झाल्यास सामाजिक उत्तरदायित्व निधीतून तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यात येईल. महिलांच्या सुरक्षेच्या विषयावर लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल, असेही पालकमंत्री म्हणाले. वारीत स्वच्छतेचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे त्यांनी विशेष कौतुक केले.श्रीमती चाकणकर म्हणाल्या, साधुसंतांच्या विचारधारा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. पंढरपूर वारीच्या निमित्ताने हा विचार सर्वत्र पोहोचतो. पंढरीच्या वारीला जाणाऱ्या महिलांची संख्या वाढते आहे. वारीदरम्यान महिलांना २३ ते २४ दिवस चालावे लागते. या कालावधीत त्यांना एकदा तरी मासिक पाळीला सामोरे जावे लागते. त्यांची ही समस्या लक्षात घेऊन आरोग्यवारी अभियान सुरू करण्यात आले आहे.वारी दरम्यान महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिनची व्यवस्था करण्यात आली आहे. स्तनदा मातांसाठी वारी मार्गावर हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे. महिलांसाठी स्वतंत्र डॉक्टर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. महिलांसाठी '१०९१' टोल फ्री क्रमांक आणि पिवळ्या रंगाच्या दुचाकीवर मदतीसाठी दूतांची व्यवस्था केली आहे. महिला वारकऱ्यांच्या हस्ते १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. महिलांच्या आरोग्यासोबत त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार धंगेकर म्हणाले, वारीच्या निमित्ताने सर्व धर्मातील एकात्मता दिसून येते. वारीसाठी जिल्हा प्रशासनाने चांगल्या सुविधा केली आहे. महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्यवारी उपक्रम स्तुत्य असून वारकऱ्यांसाठी अधिक सुविधा देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या सदस्या दीपा ठाकूर यांनी प्रास्ताविकात आरोग्यवारी अभियानाची माहिती दिली. वारी सोहळयादरम्यान महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महानगरपालिका आणि जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.प्रारंभी पालकमंत्री श्री.पाटील यांच्या हस्ते आरोग्यवारी अभियान आणि महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या कक्षाचे उदघाटन करण्यात आले.

# भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष समानतेचा विचार : डॉ.भारती पाटील



कोल्हापूर/प्रतिनिधीः भारतीय राज्यघटनेत स्त्री -पुरुष समानतेचा विचार मांडल्याने समाजाची प्रगती झाल्याचे प्रतिपादन शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन समन्वयक प्रा.डॉ.भारती पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषया अंतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या महाराष्ट्राची संकल्पना : लिंग भाव समानता या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे होते, यावेळी उपकुलसचिव डॉ.संजय कुबल, उपकुलसचिव श्री.सी.एस.कोतमिरे यासह विद्यार्थी, समन्वयक, सहा. प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व सेवक उपस्थित होते.

डॉ.पाटील म्हणाल्या की, शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक सेवा या क्षेत्रात बरोबरच स्त्री पुरुष समानता या बाबतीत ही महत्वपूर्ण कार्य झालेले आहे.याला दोन गोष्टी कारणीभूत आहेत एक म्हणजे स्त्री-पुरुष समानतेच्या परंपरेचा व १९५० साली राज्यघटने मध्ये स्त्री -पुरुष समानतेचा मांडलेला विचार होय,राज्यकर्ते महिला सबलीकरणाच्या बाबतीत जागृत झाल्यामुळे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढलेला दिसतो.स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमध्ये महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय श्री.शरद पवार यांनी घेतल्यामुळे ग्रामीण महिला राजकरणात सहभागी होऊ लागल्या.एकल स्त्रियांसाठी धोरण अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. स्त्री -पुरुष समानतेच्या जागृत विचारामुळे महिला संघटना निर्माण होण्यास मदत झाली,असे डॉ.पाटील यांनी सांगितले. यावेळी प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ.सुर्यकांत गायकवाड यांनी केले,पाहुण्यांची ओळख व सूत्रसंचालन सचिन भोसले यांनी केली व आभार डॉ.नितीन रणदिवे यांनी केले.

# सांगवी बु!येथे रिपाइं(आठवले गट)नूतन शाखेचे अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते उद्घाटन




अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बु!येथे रिपब्लीकन पक्ष( आठवले गट) चे नूतन शाखेचे उद्धाटन तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते करण्यात आली आहे. याप्रसंगी बोलतांना अविनाश मडिखांबे म्हणाले की, रिपाइं च्या कार्यकर्त्यांनी रिपाइंचा व्यापकता समाजातील इतर जाती धर्माच्या लोकांपर्यंत पोचवाव्यात आणी पक्षाच्या माध्यमांतून शासनाचा योजना प्रत्येक गरीब जनते पर्यंत पोचवून गरीब जनतेचा आर्थिक प्रश्न मार्गी लावण्यात यावे. यावेळी सांगवी गावचे सरपंच बाळासाहेब भोसले,बकर चाचा शुभम मुडीखांबे रोहित मडिखांबे सुरेश सोनकांबळे अंबादास शिंदे इस्माईल आळंद शाखा अध्यक्ष भीमराव गायकवाड.उप अध्यक्ष नितीन सोनकांबळे.सचिव रोहीत सोनकांबळे.सहसचिव नागेश बाबर कोष्याध्यक्ष वालचंद सोनकांबळे सदस्य दिनेश गायकवाड.खंबिर साथ शिवानंद सोनकांबळे.दयानंद सोनकांबळे.संतोष गायकवाड.प्रमुख उपस्थिती सरपंच बालासाहेब भोसले. मा. उप सरपंच अबुबकर (काका) शेख, बकर शेख. मौलाली शेख,शाम सोनकांबळे,विकास गायकवाड,विकी सोनकांबळे, अमोल सोनकांबळे,गौतम गायकवाड,दत्ता गायकवाड, यशवंत गायकवाड,योगेश सोनकांबळे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# प्रथमेश इंगळेंचा हसापूर ग्रामस्थांच्या वतीने सन्मान

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष व नगरसेवक तथा शहरातील प्रतिष्ठित नागरिक महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे यांनी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षेत येथील इंडियन मॉडेल स्कूल मधून विज्ञान शाखेतून द्वितीय क्रमांक पटकावून यश संपादन केल्याबद्दल महेश इंगळे मित्रपरिवार व हसापूर ग्रामस्थांच्या वतीने प्रथमेश इंगळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.महेशजी इंगळे मित्र परिवार हसापूर, परमेश्वर कामठी, गौतम घाटकांबळे, राजकुमार कामठी, महेश्वर स्वामी, मधुकर सदाफुले, अभय जाधव, अभिषेक कामठी, सैपन सहाय्यक, रोहित जाधव, रोहित चव्हाण, युनूस शेख, बाबा नायकवडी यांनी हा सन्मान केला.याप्रसंगी मंदिर



समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी, महेश मस्कले इत्यादी उपस्थित होते.

# नांदेडच्या बोंडार गावात जावुन दिवंगत अक्षय भालेराव यांच्या कुटूंबियांची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली सांत्वनपर भेट

मुंबई/नांदेडः नांदेड जिल्हयातील बोंडार गावात महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केल्याच्या रागातुन दलित तरुण अक्षय भालेराव यांची निर्घुण हत्या घडल्याची निषेधार्ह घटना घडली. त्या गावात आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिवंगत अक्षय भालेराव यांच्या घरी जावुन त्यांच्या कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. तेथे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने ४ लाख रुपये सांत्वनपर निधी देणार असल्याचे जाहीर केले. सामाजिक न्याय विभागातर्फे सव्वा आठ लाख रुपये मदत घोषीत करण्यात आली असुन त्यातील सव्वा चार लाखाचा धनादेश हा दिवंगत अक्षय भालेराव यांच्या कुटूंबियांना देण्यात आला. मुख्यमंत्री निधीतुन त्यांना जास्तीतजास्त सांत्वनपर आर्थीक मदत राज्य शासनाने द्यावी. तसेच अक्षय भालेराव यांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस कायस्वरुपी राज्य शासनाची नोकरी देण्यात यावी. अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्र्याकडे केली असून याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी शासनाकडे पाठवावा अशी सूचना ना. रामदास आठवले यांनी यावेळी केली.




यावेळी ना. रामदास आठवले यांनी नांदेडचे जिल्हाधिकारी, नांदेडचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हापरिषदेचे अधिकारी, पोलीस अधिकारी यांच्या समवेत बैठक घेवून दिवंगत अक्षय भालेराव यांच्या कुटूंबियांचे सुरक्षित स्थळी पुनर्वसन करण्याबाबत राज्य शासनाकडुन भरीव आर्थीक मदत देण्याबाबत तसेच दिवंगत अक्षय भालेराव यांच्या कुटुंबातील त्यांच्या लहान भावास शासकीय नोकरी देण्याबाबत सुचना केल्या आहेत. यावेळी दिवंगत अक्षय भालेराव यांचे आई वडिल, त्यांचा लहान भाऊ तसेच सर्व भालेराव कुटूंब उपस्थित होते.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य संघटक विजय सोनवणे, मिलींद सितोणकर, प्रकाश चंद्रकांत ठाणेकर, निखील कांबळे , शिवाजी भालेराव आदि मान्यवर उपस्थित होते. या बोंडार हवेली गावात गेल्या ७० वर्षापासुन भिमजयंती करण्यास सवर्ण समाजाचा विरोध होता. मात्र यंदा दिवंगत अक्षय भालेराव यांनी पुढाकार घेवून गावामध्ये पहिल्यांदाच आंबेडकर जयंती साजरी केली. तसेच आंबेडकर जयंतीनिमीत्त गावातुन मिरवणुक काढली त्याचा राग म्हणुन दिवंगत अक्षय भालेराव यांची निर्घुण हत्या करण्यात आली या घटनेचा निषेध ना. रामदास आठवले केला. ही अत्यंत निंदनीय घटना आहे. महाराष्ट्राच्या प्रतिमेवर कलंक लावणारी घटना आहे.

महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून देश आणि विदेशात त्यांच्या ज्ञानाचा गौरव होत आहे. जगात त्यांचा ज्ञानाचे प्रतिक असा गौरव होत आहे. देशात सर्व पक्षाचे तसेच सर्व धर्मीयांचे लोक महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करतात.

मात्र महाराष्ट्रात नांदेड च्या बेंडार गावात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून एका दलित तरुणाची हत्या करण्यात आली ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे. गावातील सवर्ण समाजाची सुध्दा ही जबाबदारी आहे की त्यांनी समाजामध्ये सुध्दा सलोखा ठेवला पाहिजे. आमचा हाच प्रयत्न आहे की, समाजामध्ये सामाजिक सलोखा राखला जावा. या प्रकरणात मात्र ज्या आरोपींनी दलित तरुणाची हत्या केली त्यांना फासावर लटविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. दलितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराविरुध्द यांच्यावर जरब बसावा व सामाजिक सलोखा सुध्दा राहील. आणि या प्रकरणी पोलीसांनी चांगले काम केले असुन सर्व आरोपींना अटक केली आहे. केवळ एक आरोपी फरार आहे. त्याच्याही अटकेसाठी आपण पोलीस अधिका-यांशी बोललेला आहोत. सर्व आरोपींना या गुन्हयात दोषी होवुन त्यांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे त्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी एड. उज्वल निकम यांची विशेष सरकारा वकील म्हणून नेमणुक करण्यासाठी आणि खटला जलदगती न्यायालयामध्ये चालविण्यासाठी आपण शासनाकडे प्रयत्न करणार आहोत असे माहीती ना. रामदास आठवले यांनी प्रसिध्दी माध्यमांना यावेळी दिली.

## शब्दकोडे क्र २५



आडवे शब्द २. दोन सागरांना जोडणारा चिंचोळा प्रवाह ५. उत्पत्ती, जन्म ८. युधिष्ठिर १०. राजकारणी डावपेच ११. अपयश घेऊन माघारी येणे १३. वर्ष १५. दरवाजा १६. निकड १७. दोन्ही १९. वानराची जात २१. अवैध मार्गाने येणाऱ्या लक्ष्मीचे वाहन २५. कार्यक्रम २७. कमी होणे २८. खळबळजनक २९. संन्याशी ३१. पशूप्रमाणे ३३. चिन्ह ३५. चिंता ३६. उसाचा रस काढण्याचे पारंपरिक साधन ३८. टिंगल ३९. बँड बरोबर वाजवण्याचे वाद्य? ४०. लेखनपद्धती ४२. निर्णय, तड ४४. बरोबरी, माळ ४५. धाक ४७. उन्हाळ्यातला त्रास ४८. मदत ५०. माता ५२. अग्नी ५४. अरण्य ५५. खिळा (संस्कृत) ५७. 'भेटीलागी जीवा, लागलीसे आस...' ५९. प्रहर ६१. वस्त्र ६३. मृत्तिका ६४. लोणच्यातील असल्यास चटकदार ६५. छिद्र ६६. काळवीट याचाच प्रकार ६८. '-- आज माझी नसे साथ द्याया' ६९. तणाव ७०. आप्त ७१. पती व पत्नीची आई ७२. पुष्कळ ७३. अनाठायी खचर ७५. भूकंप ७७. सरकारी अधिकारी ८०. जाड भाकरी ८३. खात्री ८४. उदासी, मनाची मरगळ ८६. सुखरूप ८९. इसम ९१. धान्य पिकवणारी जमीन ९३. नाजूक ९४. डोळ्याच्या उघड्या भागावरील गोलाकार पारदर्शक आवरण ९५. नवीन ९६. नामांकित ९९. चामखीळ १००. मजकुराच्या तळाशी दिलेला संक्षिप्त खुलासा किंवा टीप १०१. विनयी १०२. मूर्खपणे सादर केलेले मत-विचार १०३. सीता

उभे शब्द १. शेकडा प्रमाण २. अनुरूप ३. धन ४. धुके ५. विष ६. दमयंतीचा पती ७. नूतन ८. कोथिंबिरीच्या बिया ९. गाढव १२. पोटाला लागलेली रग १४. लहान १५. खट्याळ १७. पाणी व जमीन दोन्हीकडे राहू शकणारा १८. सातू १९. तरट २०. प्रेमात पाडणारे, मोहक २२. पदोन्नती २३. मौनव्रत धारण केलेला २४. करंगळीजवळचे बोट २६. पिछेहाट ३०. किनारा ३२. सहापैकी थंडीत येणारा ऋतू ३३. जनता ३४. कळी ३७. मिळकत ३९. डझन ४१. त्रास ४२. आकाशाचा रंग ४३. छोटा ४४. कापसाचे बी ४६. ओळखीची व्यक्ती भेटल्यावर अभिवादनाचे खास मराठमोळे शब्द ४७. पूर्व दिशा ४९. कन्या ५०. द्वेष ५१. विड्यातील एक घटक ५२. पार्वती ५३. पायताण ५४. आसाममधील प्रसिद्ध अभयारण्य ५६. क्षार, मीठ ५८. स्तुती ६०. शासनाचे उत्पन्न ६२. अकबराच्या दरबारची खासियत ६७. ज्वर ६८. लाडका ६९. धातूचा तंतू, धुंदी ७०. मचूळ ७१. शांतता ७३. अविरत ७४. वेदना ७६. निर्धन ७८. पत्नी ७९. व्यवसाय ८१. बंगाली मिठाईचा प्रकार ८२. भरधाव ८४. शेतीचे पारंपरिक औजार ८५. चंद्रदर्शन होणारी अमावस्या ८७. तांबडा ८८. शोध ८९. उपमर्द ९०. प्रिय व्यक्तींची भेट ९१. अखेरीस ९२. हे बाळले की सुंठ बनते ९५. पाण्याची तोटी ९७. लोक ९८. लाह्या, वैदिक लग्नातील एक विधी- -- होम ९९. पुष्परस

## काळे सोबत फिरणारे मोकळ्यात बोलणारे..

# रोपळे येथील जाहीर सभेत अभिजीत पाटील यांची भालकेसह युवराज पाटील अन् गणेश पाटील यांच्यावर टीका



पंढरपूर/प्रतिनिधीः सध्या सहकार शिरोमणीची ही निवडणूक सुरू आहे. यामध्ये सत्तांतर करण्यासाठी आम्ही आमचं पॅनल निवडणुकीत उतरविले आहे. यामुळे मी यामध्ये उमेदवार नसतानाही ठामपणे आपले देणे देण्याची हमी घेतली आहे. तसे सत्ताधारी काळे यांच्यासाठी जे नेते धावधाव करीत आहेत. ते नेते स्वतः ही देणं देण्याची हमी घेत नसून ते नुसत मोकळ्यात बोलत आहेत त्यामुळे त्यांच्या बोलण्याला फारसे महत्व नाही असा टोला चेअरमन अभिजीत पाटील यांनी भगीरथ भालके, युवराज पाटील आणि गणेश पाटील यांना लगावला आहे.

शुक्रवारी सायंकाळी रोपळे येथे परिवर्तन पॅनलचे उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पाटील बोलत होते. यावेळी मान्यवर उपस्थित होते. यावर्षी निवडणूक असतानाही ज्यांनी सभासद आणि कामगार यांचं देणं देण्याची सोय लावली नाही. यापेक्षा दुसर काही दुर्दैव नसून यापुढेही बिले मिळणे अवघड वाटत असल्याने च, आमच्यावर विश्वास ठेऊन अनेकजण आमच्याकडे येत असल्याचेही त्यांनी सांगितले. ही निवडणूक सहकार शिरोमणी कारखान्याची असून आम्ही त्याबाबत विश्वास देत आहोत. मात्र काळे यांच्याकडून विषय बदलून आमच्यावर वेगळी टीका केली जात आहे.त्यामुळे या कारखान्यातील सभासद आणि कामगार यांना याबाबत सर्वकाही आता समजले आहे असेही पाटील यांनी बोलताना सांगितले.पुढे बोलताना अभिजीत पाटील यांनी काळे यांना अडचणीमुळे जमले नाही. त्यामुळे आता हैद्राबादला जाऊन आलेले भगीरथदादा बिलासाठी मदत करतील अन् घोषणा करतील असे वाटले होते. युवराज पाटील आणि गणेश पाटील यांचेकडून काही मदत होईल असे वाटले होते. परंतु असे कुठच काही दिसून आले नाही.त्यामुळे ही निवडणूक परिवर्तन घडविल्याशिवाय राहणार नाही असेही पाटील यांनी सांगितले. बाकी कारखान्याची अवस्था आणि काळे यांच्या मागील अनेक वर्षातील कारभार तोट्यात कसा आला आहे. याची माहिती देऊन आपण या कारखान्याला सुधारून दाखवू शकतो असा विश्वासही अभिजीत पाटील यांनी यावेळी दिला आहे. यावेळी डॉ बी.पी . रोंगेसर, प्रा. तुकाराम मस्के, अमरजित पाटील, रणजित बागल, संजय पाटील, यांच्यासह या भागातील लोकांनी भाषणे केली.

### प्रत्येक वर्षी तोट्यात हिशोब दाखविणाराचा हिशोब करा

सहकार शिरोमणी साखर कारखाना चेअरमन कल्याणराव काळे यांच्याकडे कारभार आल्यापासून व्यवहार व्यवस्थित न पार पडल्याने बदनाम होत आहेत. कारखान्याचा दरवर्षी तोटा वाढविण्याचे काम चालू आहे. मागील वेळेस संधी दिली होती. त्या संधीचे सोने करण्याऐवजी माती करून ठेवली आहे.त्यामुळे आता त्यांचा हिशोब करून घरी पाठवायचे यासाठी हा परिवर्तनाचा लढा मागील अनेक वर्षापासून सुरू असून या लढ्याला या निवडणुकीत नक्की यश मिळेल असा विश्वास दिपक पवार यांनी व्यक्त केला आहे.

# पुणे येथे जी २० चौथ्या शैक्षणिक कार्यगटाच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, शिक्षण मंत्रालयाकडून देशभरात जनभागीदारी कार्यक्रमांचे आयोजन

पुणे : भारताच्या जी २० अध्यक्षपदाच्या कार्यकाळाला केंद्रबिंदू मानून लोकांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टीकोन आणि मार्गदर्शनानुसार, संमिश्र शिक्षण प्रणालीच्या संदर्भात मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या संकल्पनेला प्रोत्साहन आणि समर्थन देण्याच्या उद्देशाने शिक्षण मंत्रालय अनेक उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करत आहे.

याच उद्दिष्टाच्या अनुषंगाने, शिक्षण मंत्रालय सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सोबतीने देशभरात जनजागृती करण्यासाठी तसेच विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संपूर्ण समुदाय अशा विविध भागधारकांमध्ये जी-२०, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तसेच मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान याबाबत अभिमानाची भावना जागृत करण्यासाठी जनभागीदारी या कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. याच संदर्भात १ ते १५ जून २०२३ या कालावधीत विविध कार्यशाळा, प्रदर्शने, चर्चासत्रे

आणि परिषदांसह अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी देशभरात राज्य, जिल्हा, गट, पंचायत आणि शालेय स्तरावर या कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाणार आहे.

जनभागीदारी कार्यक्रम १९ ते २१ जून २०२३ दरम्यान महाराष्ट्रातील पुणे येथे होणाऱ्या चौथ्या शिक्षण कार्यगट बैठकीच्या (चौथा एवथत्र) मुख्य कार्यक्रमापर्यंत सुरू राहील आणि २२ जून २०२३ रोजी शिक्षण मंत्रिस्तरीय बैठकीने या उपक्रमाची सांगता होईल.

मंत्रालयाद्वारे आयोजित कार्यक्रमांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:

सर्व शाळांमध्ये जी २०, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तसेच मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जनभागीदारी कार्यक्रम – १ ते १५ जून २०२३.

महाराष्ट्रात पुणे येथे १७ ते २२ जून २०२३ या कालावधीत शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि कौशल्य शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्तम पद्धतींचे प्रदर्शन.

१७ आणि १८ जून २०२३ रोजी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या विषयावर २ दिवसीय राष्ट्रीय परिषद.

जनभागीदारी हा संपूर्ण कार्यक्रम एक यशस्वी उपक्रम ठरला असून उपक्रमाच्या नवव्या दिवसापर्यंत ५.०१ लाख शाळांमधील १.१९ कोटी विद्यार्थी आणि १३.९ लाख शिक्षक तसेच १९.५ लाख लोकांसह एकूण १.५३ कोटी लोकांनी यात सहभाग नोंदवला आहे. लोकांचा हा सहभाग केवळ अभूतपूर्वच आहे, इतकेच नाही तर त्यातून जनतेमध्ये या उपक्रमाबाबतचे अत्युच्च स्वारस्य आणि प्रतिबद्धता दिसून येते.

# मनोरमा बँकेच्या संचालक पदी स्वेरीचे डॉ.बी.पी.रोंगे यांची निवड



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या व वार्षिक सुमारे साडे नऊशे कोटी रुपये उलाढाल असणाऱ्या मनोरमा सहकारी बँकेच्या नूतन संचालकपदी पंढरपूर येथील स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत मोरे यांच्या नेतृत्वाखाली बँकेची ही बिनविरोध निवडणूक पार पडली. नव्या संचालक मंडळामध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांचा समावेश करण्यात आला आहे. मनोरमा बँकेच्या पुणे व सोलापूर येथे सहा शाखा आहेत तसेच मनोरमा मल्टीस्टेटच्या ७२ शाखा आहेत, मनोरमा बँक, मनोरमा मल्टीस्टेट व इतर संस्था यांची एकूण वार्षिक उलाढाल सुमारे एक हजार ९५० कोटींची आहे. बँकेचा एनपीए गेल्या पाच वर्षांपासून शून्य टक्क्यांवर आहे. त्यामुळे बँकेची आर्थिक स्थिती मजबूत आहे. शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक दृष्ट्या भक्कम बनविण्यासाठी डॉ.बी.पी.रोंगे सर हे नाव राज्यात प्रसिद्ध आहे. 'स्वेरी परिवार व इंजिनिअरिंग कॉलेज, पंढरपूर या संस्थांची शिस्तबद्ध व यशस्वी रीतीने वाटचाल करणारे प्राचार्य डॉ.रोंगे सर यांच्या शिस्तीचा व अनुभवाचा मनोरमा परिवार व बँकेस निश्चितपणे लाभ होईल तसेच नव्याने होणाऱ्या पंढरपुर शाखेच्या वाटचालीसाठी डॉ. बी.पी. रोंगे सरांचा सक्रीय सहभाग व बहुमोल मार्गदर्शन निश्चितपणे मोलाचे ठरेल.' असे गौरवोद्गार बँकेचे चेअरमन व मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे यांनी काढले. पंढरपूर तालुक्यातील राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातून डॉ.रोंगे सरांच्या या निवडीचे स्वागत केले जात आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील, मनोरमाचे व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, परिवाराच्या मार्गदर्शिका शोभा मोरे, तसेच सिताराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रा.शिवाजीराव काळुंगे,सहायक निबंधक व्ही.बी. माने, माजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.विश्वासराव मोरे, डॉ.एम.एम. पवार यांनी नूतन संचालक डॉ. बी.पी. रोंगे यांचे अभिनंदन केले.

# नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा : राज्यपाल रमेश बैस



अकोला : नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी थोडा कालावधी शिल्लक आहे. याबाबत आवश्यक तयारी व भरीव अंमलबजावणी करून महाराष्ट्रातील विद्यापीठांनी देशापुढे उदाहरण उभे करावे, अशी अपेक्षा राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे व्यक्त केली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत नऊ अकृषी व कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झाली, त्यावेळी ते बोलत होते. कृषी मंत्री अब्दुल सत्तार, राज्यपालांचे प्रधान सचिव संतोष कुमार, उच्च व तंत्र शिक्षण प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे. पी. गुप्ता आदी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय धोरणाच्या तयारीचा आढावा व विद्यापीठाशी निगडित सामायिक विषयांवर यावेळी चर्चा झाली.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, देशातील विद्यापीठांच्या रँकिंग यादीत महाराष्ट्रातील केवळ दोन विद्यापीठांचा समावेश आहे. सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या रँकिंग यादीत येण्यासाठी सर्व विद्यापीठांनी आवश्यक गुणात्मक सुधारणा करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल वेळेवर लागण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. विद्यार्थ्यांचे भवितव्य या निकालावर अवलंबून असते. ही जबाबदारी ओळखून वेळापत्रक गांभीर्यपूर्वक पाळावे. ई-समर्थ या डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर व्हावा. उद्योगांची गरज ओळखून नव्या संशोधनाला चालना द्यावी. संशोधन व विकास कक्ष महाविद्यालय स्तरावर कार्यान्वित व्हावेत. कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कौशल्य विकास व रोजगाराभिमुख शिक्षणावर भर द्यावा. डिजिटल इंडिया, स्टार्ट अप इंडियासारख्या उपक्रमांचा लाभ घ्यावा. गतिमान कार्यवाहीसाठी माहिती तंत्रज्ञान प्रभावीपणे वापरावे, असे निर्देश त्यांनी दिले.


केंद्र शासनाच्या योजना, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविलेल्या योजना, संशोधन प्रकल्प आदी विविध बाबींचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू मधुसूदन पेन्ना, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एस. आर. गडाख, गोंडवना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत सोकारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उदय भोसले, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू विजय माहेश्वरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी निमा अरोरा आदी उपस्थित होते.

कृषी प्रदर्शनाची पाहणी

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित कृषी प्रदर्शनाचा शुभारंभ राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते झाला. विद्यापीठातील ज्वारी, तेलबिया, कडधान्य, कापूस, गहू आदी पिकांबाबतचे संशोधन, उद्यानविद्या, कृषी विद्या, मृद विज्ञान, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी स्टॉलची राज्यपालांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधून कृषी संशोधनाबाबत माहिती घेतली. यावेळी कृषी मंत्री अब्दुल सत्तार, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, जिल्हाधिकारी निमा अरोरा, निवासी उपजिल्हाधिकारी शरद जावळे, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी आदी उपस्थित होते.

दरम्यान राज्यपाल रमेश बैस यांचे आज सकाळी साडेआठच्या सुमारास अकोला रेल्वे स्थानकात आगमन झाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे व जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ कटीयार, पोलीस अधीक्षक संदिप घुगे,उपविभागीय अधिकारी शरद जावळे, रामेश्वर पुरी, मंडल रेल प्रबंधक धीरेंद्रसिंह, तहसिलदार सुनिल पाटील आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. बैस यांच्या आगमनानंतर पोलिस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

# बिपरजॉयचं संकट! येत्या १२ तासांत चक्रीवादळाची तीव्रता वाढणार



पुणे : बिपरजॉय चक्रीवादळ येत्या काही तासांत अधिक तीव्र होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. महाराष्ट्रासह गुजरातच्या किनारपट्टी भागातही याचा परिणाम दिसून येणार आहे. भारतीय हवामान विभागाने रविवारी दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, 'बिपरजॉय चक्रीवादळ पूर्वमध्य अरबी समुद्रावर ११ जून २०२३ रोजी मध्यरात्री २.३० वाजता पोरबंदरच्या दक्षिण-नैऋत्येस सुमारे ५१० किलोमीटर अंतरावर होते. पुढील सहा तासांमध्ये हे चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. १५ जून रोजी दुपारच्या सुमारास बिपरजॉय चक्रीवादळ पाकिस्तान आणि लगतच्या सौराष्ट्र आणि कच्छच्या किनार्याजवळ पोहोचण्याची शक्यता आहे.'भारतीय हवामान विभागाने शनिवारी दिलेल्या माहितीनुसार, पुढील १२ तासांत बिपरजॉय चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र किंवा गुजरातच्या किनारपट्टीवर हे चक्रीवादळ धडकण्याची शक्यता नाही. पण या भागात वादळी वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. चक्रीवादळ गुजरातच्या पोरबंदर किनारपट्टीपासून २०० ते ३०० किलोमीटर अंतरावरून पुढे सरकणार असल्याची शक्यता आहे. सध्या हे चक्रीवादळ पाकिस्तानच्या दिशेने पुढे जात असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. चक्रीवादळ पाकिस्तानमध्ये आदळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, गुजरातमध्ये जोरदार वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. खचऊ ने म्हटलं आहे की, 'बिपरजॉय' चक्रीवादळ पुढील १२ तासांत अत्यंत रौद्ररूप धारण करण्याची शक्यता आहे.

बिपरजॉय चक्रीवादळाचा परिणाम भारतातही दिसून येत आहे. देशात चार राज्यांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण अरबी समुद्राच्या आसपासच्या भागात ५० ते ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहत आहे. चक्रीवादळ पुढील २४ तासांत उत्तर आणि उत्तर-पश्चिम दिशेने सरकेल, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. देशात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटकसह गोव्यामध्ये या चक्रीवादळाचा प्रभाव दिसून येणार आहे. त्यामुळे या राज्यांमध्ये सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे.

बिपरजॉय चक्रीवादळाचा परिणाम अरबी समुद्राला लागून असलेल्या देशांवर होण्याची शक्यता आहे. यामध्ये भारत, ओमान, इराण आणि पाकिस्तानसह अरबी समुद्राला लागून असलेल्या इतर देशांचा समावेश आहे. बिपरजॉय चक्रीवादळ पूर्व-मध्य अरबी समुद्रातून हळूहळू उत्तर आणि वायव्येकडे सरकत आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गोवा, गुजरातसह कर्नाटकच्या किनारपट्टी भागात मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार चक्रीवादळाचा परिणाम किनारी भागात होऊ शकतो. येथे वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# आरोग्य मंत्रालयाचा 'गुरुमंत्र'; चहा-कॉफी अन् दारूला तूर्तास अलविदा करण्याचा सल्ला

पुणे : जोपर्यंत ते घरात आहोत, तोपर्यंत काहीच वाटत नाही, पण घराबाहेर पडलं की, जीवघेणी गरमी अगदी वितळवून टाकते, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. वातावरणात वाढणारी तीव्र उष्णता अगदी हैराण करुन टाकते. डिहायड्रेशन, थकवा आणि उष्माघात सध्या सर्वांच्याच चिंतेचा विषय ठरत आहे. डिहायड्रेशन टाळण्यासाठी घरीच राहणं आणि शक्य तेवढं घराबाहेर टाळावं, असा सल्ला वारंवार दिला जात आहे. या रणरणत्या उन्हापासून वाचण्यासाठी काही खास गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. अलिकडेच आरोग्य मंत्रालयानं उष्णतेच्या लाटेपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी काही आरोग्यमंत्र दिले आहेत. ज्यांचं पालन करून तुम्ही या उष्णतेवर मात करू शकता आणि शरीराची काळजी घेऊ शकता.

आरोग्य मंत्रालयानं जारी केलेल्या माहितीनुसार, Heatwave पासून बचाव करायचा असेल, तर त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातून काही गोष्टी तूर्तासतरी पूर्णपणे काढून टाकाव्या लागतील. सरकारनं लोकांना दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड शीतपेय टाळण्याचा सल्ला दिला आहे. कारण त्यामुळे शरीरातील अधिक द्रवपदार्थांचे नुकसान होऊ शकतं. तसेच, हाय-प्रोटीन फूड आणि शिळे अन्नपदार्थ न खाण्याचा सल्ला मंत्रालयानं दिला आहे.

वातावरणातील उष्णता लक्षात घेता, ज्या पदार्थांचा आहारात समावेश कराल, तो विचारपूर्वक कराल, असंदेखील आरोग्यमंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.

Heatwave दरम्यान, तासन्तास किचनमध्ये जेवण बनवणं टाळा.

जेवण बनवत असताना घराच्या खिडक्या आणि दरवाजे उघडा.

मद्यपान, चहा-कॉफीचं सेवन टाळा. कोल्ड ड्रिंक पिणंही टाळा.

हाय प्रोटीन फूड खाणं टाळा.

उबदार कपडे घालणं टाळा, त्याऐवजी हलके आणि सुती कपडे घाला.

स्वतःला हाड्रेट ठेवण्यासाठी मुबलक पाणी प्या.

# टाळ-मृदंगाच्या गजरात संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

पुणे : 'ज्ञानोबा माऊली-तुकाराम' असा नामघोष, टाळ-मृदंगाच्या तालावर होणारा विठूनामाचा गजरष्ठ तुळशी वृंदावन आणि दिंड्या-पताकाष्ठ अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराजांच्या पालखीने आज पंढरपूरकडे प्रस्थान केले. पालखी सोहळ्यात भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

देहू येथील जगद्गुरू तुकाराम महाराज मंदिरात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सपत्निक पादुकांचे पूजन आणि आरती केली. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, माजी राज्यमंत्री बाळासाहेब भेगडे, बारामती हाय-टेक टेक्स्टाईल पार्कच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आदी उपस्थित होते.पूजेनंतर उपस्थित सर्वजण वारकऱ्यांसह टाळ-मृदुंगाच्या गजरात दंग झाले. यावेळी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. नितीन मोरे, पालखी सोहळा प्रमुख माणिक मोरे, संतोष मोरे, विशाल मोरे, संस्थांचे विश्वस्त संजय मोरे, भानुदास मोरे, अजित मोरे आदी उपस्थित होते. महापूजेनंतर पालखीने इनामदारवाड्यातील मुक्कामाकडे प्रस्थान केले.